# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९२ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८०३ : मुंबईचा पाया घालणारे जगन्नाथ शेठ यांचा जन्मदिन.

१९०९ : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांचा जन्म झाला.

१९२१ : काशी विद्यापीठाचे गांधीजींच्या हस्ते उद्घाटन झाले.

१९२९ : राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना झाली.

सेन्सेक्स ८४,०६५.७५ +४८५.३५ (०.५८%)

डॉलर ₹ ९०.६७

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३३ | १५ |
| दिल्ली | २६ | १२ |
| मुंबई | ३२ | १९ |
| नागपूर | ३१ | १५ |
| पुणे | ३३ | ११ |

**सुविचार**

आपल्या मनाचे शिल्पकार बना; स्वप्नांना आकार देण्याचे काम करा.

सूर्योदय - सूर्यास्त

स.-७:०१ संध्या-६:२३

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,५९,६८५/- ३,००,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०

पिल बाग : ११०१ ते ११०२

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### बारावीची परीक्षा आजपासून गेल्यावर्षीपेक्षा विद्यार्थी संख्येत वाढ



**पुणे ।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे उद्यापासून (१० फेब्रुवारी) राज्यभरात बारावीची परीक्षा सुरू होत आहे. या परीक्षेसाठी १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा बारावीच्या विद्यार्थिसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

### मुंबईचं आव्हान संपुष्टात



**मुंबई ।** के.एल. राहुल आणि रवीचंद्रन स्मरण यांच्या दमदार खेळींच्या बळावर कर्नाटकने रणजी करंडक स्पर्धेत ४२ जेतेपदं नावावर असणाऱ्या मुंबईला ४ विकेट्सनी नमवलं. या पराभवासह मुंबईचं यंदाच्या रणजी करंडक स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं.बीकेसी इथल्या शरद पवार क्रिकेट अकादमी इथे झालेल्या लढतीत, मुंबईचा पहिला डाव अवघ्या १२० धावांतच आटोपला. मुंबईचा कर्णधार शार्दूल ठाकूरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता.

# महाराष्ट्रातील मिनी मंत्रालयावरही भाजप-शिवसेना महायुतीचेच वर्चस्व

## १२ जिल्हा परिषदांसह पंचायत समित्यांचे निकाल जाहीर



**वृत्तसंस्थत्त । मुंबई**

**राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडले होते. त्यानंतर आज (९ फेब्रुवारी) या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जात आहे. या निकालांमध्ये महायुतीमधील भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी घवघवीत यश मिळाले आहे. या विजयानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

जवळपास ६० ठिकाणी भाजपा एक नंबरवर आहे. छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा. शिवसेना दोन ठिकाणी नंबर एकवर आहे, रत्नागिरी आणि रायगड. राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यामध्ये नंबर एकवर आहे. आणि जेथे तीनही पक्ष एकत्र लढलो अशा कोल्हापूर आणि लातूर येथे महायुतीत नंबर एकवर आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. भारतीय जनता पक्षानेदेखील आपला २०१७ चा रेकॉर्ड देखील भाजपाने मोडला आहे, २०१७ साली या जिल्हा परिषदांमध्ये भाजपाला १४१ जागा होत्या, पण आत्तपर्यंत घोषित झालेल्या निकालांमध्येच २३६ जागा भाजपाला मिळाल्या आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

पंचायत समिती निवडणूक निकालाबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, २०१७ साली भाजपावा एकूण २८४ जागा होत्या पण आत्तापर्यंतच्या जाहीर झालेल्या कलांमध्ये ४१० जागा भाजपाला मिळालेल्या आहेत. साधारणपणे १२५ पंचायत समितींचा कल बघितला तर यापैकी ५० पंचायत समिती या भाजपाकडे, २६ शिवसेनेकडे असतील, २३ राष्ट्रवादी काँग्रेसकडे असतील, बाकी ७-८ काँग्रेसकडे, ७ ते ८ शरद पवारांच्या पक्षाकडे आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाकडे ५ जागा असतील. त्यामुळे इथे देखील महायुतीला १२५ पैकी १०० च्या वर पंचायत समिती जिंकता आल्या आहेत.

**प्रचार न करण्याचा निर्णय घेतला**

अजितदादा पवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, त्यामुळे मी स्वत: निर्णय केला होता की, मी प्रचार करणार नाही. त्यामुळे एका आवाहनाचा व्हिडीओ सगळ्या जिल्हा परिषदांमध्ये प्रसारित केला होता. पण एकूणच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची मानसिकता यामधून समोर आली आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**➤ पुन्हा महायुतीवरच विश्वास**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचे निकाल हाती येत आहेत. आता मोजणीचा शेवटचा टप्पा चालू आहे. आत्तापर्यंत हाती आलेले निकाल आणि अंतिम टप्प्यातील कल लक्षात घेता, महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवरच आपला विश्वास दाखवला आहे. १२ जिल्हा परिषदांमध्ये भारतीय जनता पार्टी पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थापित झाल्याचे पाहायला मिळत आहे. आणि १२ ही जिल्हा परिषदांमध्ये महायुतीचीच सत्ता येईल हे आता स्पष्ट झाले आहे.

**➤ छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमला भोपळा**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत भरघोस यश मिळवणाऱ्या भाजपाने जि.प. व पं.स.निवडणुकीतही आपल्या विजयाचा सिलसिला कायम ठेवला. भाजपला पुन्हा एकदा मोठे यश मिळाले. त्यापाठोपाठ शिंदे गट हा जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. दुसरीकडे महापालिकेत तब्बल ३३ जागा जिंकणाऱ्या एमआयएमला या निवडणुकीत भोपळाही फोडता आला नाही. छत्रपती संभाजीनगरमध्ये जि.प.च्या ६३ आणि पं.स.१२६ जागांवर शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपाचा प्रभाव दिसून आला.

**एसटी कामगारांमध्ये सरकारविरोधात असंतोष**

# लालपरीची चाके १२ फेब्रुवारीपासून थांबणार



**➤** एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या घामाचे दाम नियमितपणे अदा होणे आवश्यक आहे. फेब्रुवारीच्या वेतनामध्ये फरकाच्या हप्त्याची रक्कम अदा न झाल्यास कामगारांच्या भावनांचा विस्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य परिणामांची शक्यता लक्षात घेत फेब्रुवारीच्या वेतनामध्ये फरक हप्त्याचा समावेश करून वेतन अदा करण्याबाबत तातडीने सूचना द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे औद्योगिक संबंध व प्रसिद्धी सचिव सदाशिव शिवणकर यांनी केली आहे.

**वृत्तसंस्थत्त । यवतमाळ**

**महायुती सरकारच्या काळात राज्यातील एसटी कामगारांवर अन्यायाचे सत्र सुरू असल्याची एस.टी. कर्मचाऱ्यांची भावना झाली आहे. कामगारांना सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढ फरकाच्या हप्त्याची रक्कम देण्यास पुन्हा टाळाटाळ करण्यात येत असल्यामुळे एसटी महामंडळ आणि महायुती सरकारविरोधात प्रचंड असंतोषाचे वातावरण आहे. या महिन्यात फरकाची रक्कम न मिळाल्यास संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे.**

येत्या फेब्रुवारीच्या वेतनात फरक हप्त्याची रक्कम अदा न केल्यास कामगारांच्या संतापाचा उद्रेक होईल, अशी आक्रमक भूमिका महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने घेतली असल्याचे औद्योगिक संबंध व प्रसिद्धी सचिव सदाशिव शिवणकर यांनी सांगितले. एसटी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या १२ फेब्रुवारी रोजी आंदोलन छेडणार आल्याचीही माहिती त्यांनी दिली. जानेवारी महिन्याचे वेतन अदा करण्यासाठी वेतनाची रक्कम विभागांना वर्ग करण्यात आली. मात्र ती रक्कम फक्त नियमित वेतनासाठी असल्याचे नमूद करून त्यात सन २०२०-२४ मधील वेतनवाढ फरकाच्या ४८ हप्त्यांपैकीची रक्कम समाविष्ट नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे राज्यभरातील एसटी कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष खदखदत आहे.

वेतनवाढ फरकाची रक्कम अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. ती रक्कम मिळण्यासाठी कृती समितीच्या माध्यमातून संघर्ष करण्यात आला. त्यानंतर सरकारने फरकाचा हप्ता देण्याबाबत आश्वासन (पान २ वर)

# सिंगापूरमध्ये कबुतरांना रस्त्यावर खायला टाकणं भोवलं;

## भारतीय महिलेला कोर्टाने ठोठावला दोन लाखांचा दंड

**वृत्तसंस्था । सिंगापूर**

**येथे कबुतरांना रस्त्यावर खायला टाकणं भारतीय वंशाच्या महिलेला चांगलंच भोवलं आहे. ७१ वर्षाय महिलेला कोर्टाने २ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. कबुतरांना रस्त्यावर खायला टाकण्यावरुन प्रशासनाकडून महिलेला वारंवार बजावण्यात आले होते. पण, सूचना देऊन देखील तिने कबुतरांना खायला टाकण्यास बंद न केल्याने तिच्यावर खटला चालवून दंड ठोठावण्यात आला.**



सन्मूगामनाथन शामला (वय ७१) असे या भारतीय वंशाच्या महिलेचे नाव आहे. सिंगापूर वन्यजीव कायद्यानुसार महिलेला २ लाख २६ हजार रुपये (३,२०० सिंगापूर डॉलर) एवढा दंड ठोठावण्यात आला आहे. महिलेला दंड ठोठावताना तिच्यावरील पूर्वीचे पाच गुन्हे देखील (पान २ वर)



**शरद पवार बारामती येथील त्यांच्या गोविंदबाग या निवासस्थानी होते. त्यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्याने पुण्यातील रुबी क्लिनिकमध्ये उपचारासाठी नेण्यात आलं आहे.**

# शरद पवारांची प्रकृती बिघडली, पुण्याच्या रुबी रुग्णालयात दाखल

## बारामतीहून तातडीने पुण्यातील रुग्णालयात आणण्यात आलं

**वृत्तसंस्था । बारामती**

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती अचानक बिघडल्याची माहिती समोर आली आहे. गोविंद बाग येथून त्यांना खासगी कारमधून पुण्याच्या दिशेने हलवण्यात आलं असून रुबी या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यावेळी खासदार सुप्रिया सुळे आणि त्यांचे पती सदानंद सुळे हे देखील त्यांच्या सोबत आहेत अशीही माहिती मिळाली आहे. शरद पवारांना खोकल्यासह कफाचा त्रास होत असून श्वास घेण्यासही काही प्रमाणात समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे शरद पवार यांना तातडीने गोविंदबाग बारामती या ठिकाणाहून पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक हॉस्पिटल याठिकाणी हलवण्यात आलं आहे.**

शरद पवार बारामती येथील त्यांच्या गोविंदबाग या निवासस्थानी होते. त्यांची प्रकृती अचानक बिघडली. खोकल्यामुळे त्यांचा घसा दुखतो आहे. तसंच कफाचाही त्रास जाणवतो आहे. त्यामुळे (पान २ वर)

# बांधकामातून उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर वाढते आघात!

## दीर्घकाळ धुळीच्या संपर्कात राहिल्यास दमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस, हृदयविकार, स्ट्रोक अन् अकाली मृत्यूचा धोका

**वृत्तसंस्था । मुंबई**

**मुंबईसह देशातील महानगरांमध्ये सुरू असलेल्या वेगवान बांधकामांनी शहरांचे रूप बदलले असले, तरी या विकासाच्या प्रक्रियेत उडणारी धूळ (कंस्ट्रक्शन डस्ट) आता गंभीर सार्वजनिक आरोग्य प्रश्न ठरत आहे. रस्ते रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, उंच इमारती, पुनर्विकास आणि पायाभूत सुविधांची कामे या सर्वांतून हवेत मिसळणारी सिमेंट, वाळू, चुनखडी व धातूंची सूक्ष्म कणधूळ श्वसनमार्गातून थेट मानवी शरीरात प्रवेश करत आहे. यातूनच आरोग्याच्या अनेक समस्या शहरी भागात निर्माण होत असून त्याचा मोठा फटका या बांधकाम व्यवसायातील कामगारांना बसत असल्याचे दिसून येतो.**



केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) आकडेवारीनुसार शहरी भागांतील पीएम १० आणि पीएम २.५ प्रदूषणात बांधकाम क्षेत्राचा वाटा ३० ते ४० टक्क्यांपर्यंत आहे. ही सूक्ष्म कणधूळ फुफ्फुसांमध्ये खोलवर साचते. पीएम २.५ कणांचे आकार २.५ मायक्रॉनपेक्षा कमी असल्याने ते रक्तप्रवाहातही प्रवेश करू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे की दीर्घकाळ या कणांच्या संपर्कात राहिल्यास दमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस, हृदयविकार, स्ट्रोक तसेच अकाली मृत्यूचा धोका वाढतो.

भारतातील आयसीएमआर व जीबीडी (ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज) अभ्यासानुसार, वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांमुळे देशात दरवर्षी १५ ते १६ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात. यातील मोठा हिस्सा शहरी बांधकाम-संबंधित धुळीशी जोडलेला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मुंबई, दिल्ली, पुणे, बेंगळुरू यांसारख्या शहरांमध्ये हिवाळ्यात व कोरड्या हंगामात बांधकामस्थळांजवळील पीएम १० पातळी परवानगीपेक्षा दुपटीने वाढल्याचे निरीक्षण नोंदले गेले आहे. या धुळीचा (पान २ वर)

# तिरुपती प्रसादाच्या लाडूमध्ये बाथरूम क्लीनर केमिकल?

**वृत्तसंस्था । चित्तूर**

**तिरुपती मंदिरातील लाडूच्या प्रसादावरून सुरू असलेला वाद पुन्हा उफाळला आहे. ला भेट देणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी हा प्रसाद देवाचा आशीर्वाद आणि आध्यात्मिक समाधानाचे प्रतीक आहे. मात्र, श्रद्धेचे प्रतीक असलेला हाच लाडू काही वर्षांपासून राजकीय वादाचा मुद्दा ठरत आहे. या वादाला आता नवीन वळण मिळाले आहे. लाडू तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपात भेसळ असल्याच्या आरोपांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) आपला अहवाल आंध्र प्रदेश सरकारला सादर केला आहे.**

सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये पुन्हा (पान २ वर)



## संपादकीय

### संशयाचे धुके अधिकच गडद!

तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात होऊन त्यांचा मृत्यू झाल्यानंतर गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये राजकारणात बऱ्यापैकी उलथापालथ झाली असली तरी या अपघातानंतर जे विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत, त्यांना वेळीच उत्तरे दिली नाहीत तर या निमित्ताने निर्माण झालेले संशयाचे धुके अधिकच गडद होणार आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा संशय फक्त विमान अपघाताबाबत नाही तर अजितदादांच्या मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाबाबत जी सातत्याने चर्चा सुरू झाली आहे. त्यावरूनही राजकीय संभ्रमाचे वातावरण आहे. विमानच्या अपघाताबाबत जे काही संशय व्यक्त करण्यात येत आहेत त्याचे उत्तर विमान अपघाताची चौकशी पूर्ण केल्यानंतर समोर येईलच. पण सध्या विनाकारणच अनेक जण ज्या विविध प्रकारच्या थियरीज मांडत आहेत. त्या वेळीच खोडून काढण्याचे काम सरकारी पातळीवर होणेही तेवढेच आवश्यक आहे. दुसरीकडे अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या विलीनीकरणाबाबतही सातत्याने चर्चा होत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. याबाबत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी खुलासे केले असले तरी ही चर्चा थांबायला तयार नाही. या दोन्ही विषयांबाबत सरकारी पातळीवर आणि पक्षीय पातळीवरसुद्धा वेळीच खुलासे झाले नाहीत तर विनाकारणच राज्यामध्ये संशयाचे आणि संभ्रमाचे वातावरण कायम राहणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अशा प्रकारचा कोणताही अपघात झाला तर सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याला घातपाताचे स्वरूप देण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जातो. यावेळीसुद्धा तशाच प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. शरद पवार यांनी स्वतः यामध्ये घातपात असण्याचे कोणतेही कारण दिसत नाही, असे स्पष्ट करूनही ही चर्चा थांबायला तयार नाही. सोशल मीडियावरील तथाकथित गुप्तहेर आणि हौशी तपासतज्ज्ञ याबाबत विविध प्रकारच्या थियरीज मांडत आहेत. राज्यात संशयाचे वातावरण निर्माण करणे हेच त्यामागील उद्दिष्ट दिसते. मुख्य म्हणजे काही राजकीय नेतेसुद्धा या संशयामध्ये भर घालण्याचे काम करत आहेत ही जास्त चुकीची गोष्ट आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे तथाकथित विलीनीकरण आणि विमानाला झालेला अपघात यांची विनाकारण जोडणी करण्याचे प्रयत्नही होत आहेत. १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा होणार होती अशी माहिती सातत्याने शरद पवार गटातील प्रमुख नेत्यांकडून दिली जात आहे. पण हे विलीनीकरण झाल्यावर एकत्रित गट सरकारमध्ये राहणार होता की सरकारमधून बाहेर पडणार होता या प्रश्नाला कोणीही उत्तर देताना दिसत नाही. शरद पवार गटातील भाजपचे जे कट्टर विरोधीनेते आहेत त्यांना विलीनीकरण मान्य असेल का या प्रश्नाचे उत्तरही दिले जात नाही. सरकारने विमान अपघाताबाबत संशय दूर करण्याची जबाबदारी स्वीकारायला हवी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विलीनीकरणाच्या चर्चेला कायमस्वरूपी पूर्णविराम द्यायला हवा तरच राज्यातील हे संशयाचे आणि संभ्रमाचे वातावरणही संपेल.

# शेतकऱ्यांनी बळीराजा पाणंद रस्ते योजनेचा लाभ घ्यावा : आ. राम भदाणे

## ● शेतापर्यंत जाण्याचा मार्ग सुकर ; २५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे क्लस्टर अपेक्षित

प्रतिनिधी । धुळे

**शेती शिवारातील पाणंद रस्त्यांची दूरावस्था झालेली आहे. पावसाळ्यात शेतापर्यंत पोहचणेही महाकठिण असते. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीस येतात. आता शेतकऱ्यांसाठी सरकारने महत्वाकांक्षी योजना सुरु केली आहे. शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ता योजनेचा लाभ घ्यावा. यामुळे शेतापर्यंत जाण्याचा मार्ग सुकर होणार आहे.**

या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही संबंधित विभागाला आ. राम भदाणे यांनी दिल्या. धुळ्यातील उपविभागीय कार्यालयात आ. भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची बैठक झाली. उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे, तहसीलदार अरुण शेवाळे, अप्पर तहसीलदार वैशाली हिंगे, गटविकास अधिकारी गणेश चौधरी, भूमी अभिलेख उपअधीक्षक भूषण घाडगे, तालुका कृषी अधिकारी माधुरी गायकवाड, वनपरिक्षेत्र अधिकारी भूषण वाघ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजू पाटील, प्रगतशील शेतकरी बापू चौधरी, योगेश पवार, रोहिदास पाटील, किशोर शिंदे, पंकज जयस्वाल उपस्थित होते. आ. भदाणे म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये पेरणी, आंतर मशागत, कापणी, इत्यादी कामांसाठी तसेच शेतमाल बाजारात पोहचविण्यासाठी मळणी बारमाही शेत रस्ते असणे आवश्यक आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीतील कामासाठी यंत्रसामुग्रीचा वापर वाढत असल्यामुळे शेतापर्यंत पोहचण्यासाठी चांगले रस्ते असणे गरजेचे आहे. यासाठी ग्रामीण भागात मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार २५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे क्लस्टर अपेक्षित आहे. सर्व ग्रामपंचायतीकडून प्रलंबित, अपेक्षित पाणंद रस्त्याची माहिती घेण्यात यावी. तसेच तालुक्यात २५ कि.मी. चे किती क्लस्टर होऊ शकतात. याची माहिती सादर करावी. तसेच रस्ते निश्चिती करुन घ्यावी. व प्रत्येकाला सोपविलेली जबाबदारी पार पाडावी.

**➢ आ. भदाणे म्हणाले की, पाणंद रस्त्यांची कामे कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्रामीण विकास सडक योजना विभागामार्फत करण्यात यावेत. ग्रामपंचायत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे रस्तांच्या याद्या प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही सीमांकनासाठी भूमी अभिलेख विभागाकडे देण्यात याव्यात. शेत, पाणंद रस्त्यासाठी लागणारा गाळ, माती, मुरुमसाठी स्वामित्व धन माफ असल्याने वाहतुकीला लागणारी रॉयल्टी पासेस, दुय्यम रॉयल्टी पास, झिरो रॉयल्टी पासची मागणी केल्यास ती तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.**

## वंचित बहुजन आघाडीतर्फे रक्तदान शिबीर

प्रतिनिधी । नंदुरबार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसंघर्षात खंबीर साथ देणाऱ्या, त्याग आणि समर्पणाची मूर्ती असलेल्या माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय रुग्णालय, नंदुरबार येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. नंदुरबार येथील वंचित बहुजन आघाडी व शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाबाई आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला अध्यक्ष पावभा आखाडे, राणीबाई गावित, कृष्णा सामुद्रे उपस्थित होते. माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय रुग्णालयात वंचित बहुजन आघाडीतर्फे रक्तदान शिबिरात २२ जणांनी रक्तदान केले. यावेळी नयन भिल, देवबा पिंपळे, निलेश गुलाले यांची उपस्थिती होती.

## बोरद येथे १७ फेब्रुवारीपासून पंचकुंडी विष्णू महायज्ञ

प्रतिनिधी । तळोदा

बोरद येथे श्री पंचकुंडी विष्णू महायज्ञाचे आयोजन दि.१७ ते २४ फेब्रुवारीदरम्यान सुरू होणार आहे. या विष्णू महायज्ञाचे आयोजन बोरद येथील समस्त बारगाम गुजर पटेल समाज व बोरद कलमाडी व हरसिध्दि माता ग्रुप यांनी केले आहे.

हरसिद्धी मातेच्या कृपेने समाज सहयोगाने श्रीरामाच्या परांगणात श्री पंचकुडी विष्णू महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात महामंडलेश्वर श्री हरी किशोरदास महाराज (गुजरात) यांच्या आशिर्वादाने व महंत श्री शिवशंकर दास महाराज (राजस्थान) यांच्या उपस्थितीत ह.भ.प.विजयकुमार पलोड संभाजीनगर यांच्या प्रेरणेने हा यज्ञ होणार आहे. दि. १७ फेब्रुवारी रोजी रोजी ९ वाजता नगर प्रदक्षिणा, १८ रोजी रोजी सकाळी ८ वाजता श्री गणेश पूजन मंडप पूजन, अग्निस्थापना, गुरुवार ते मंगळवार दि.१९ ते २४ फेब्रुवारीपर्यंत दररोज सकाळी ९ ते १२ आणि दुपारी ३ ते ५ दरम्यान पूजन व होम हवन होणार आहे.

तरी बोरद येथील श्रीराम मंदिर चौक येथे यज्ञास उपस्थित रहावे, असे आवाहन हरसिद्धी माता ग्रुप बोरद व कलमाडी व समस्त बारगाम गुजर पटेल समाज बोरद व कलमाडी यांनी केले आहे.

# आदिवासी संस्कृती जपणे काळाची गरज

## ● आदिवासी लोककलाकार संवाद कार्यक्रमात मंत्री डॉ. अशोक वुईके यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । शहादा

नंदुरबार- आदिवासी समाजाची समृद्ध कला, संस्कृती आणि अस्मिता अधिक व्यापकपणे समाजासमोर यावी, या उद्देशाने बिरसा कला संगम ही महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या माध्यमातून आदिवासी कलाकारांचा सन्मान, ओळख आणि संधी वाढविण्याचा प्रयत्न सुरू असून गौरवशाली आदिवासी संस्कृती जपणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री ना.डॉ. अशोक वुईक यांनी केले.



येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आदिवासी लोककलाकार संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास आ. आमशा पाडवी, नाशिक आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी अनय नांवदर तळोदा, चंद्रकांत पवार नंदुरबार, प्रमोद पाटील

धुळे, प्रगती प्रतिष्ठान जव्हारचे विरेंद्र चंपानेरकर, कल्पेश डोके, रुढी परंपरा जाणीव जागृती मंच विसरवाडीचे ईश्वर गावीत, सुर्यदर्शन मोहनदादा वळवी संस्थेचे संदीप वळवी, निलेश माळी आदि उपस्थित होते. विविध आदिवासी लोककलाकार, सांस्कृतिक कार्यकर्ते व अधिकारी उपस्थित होते. ना. डॉ. वुईके म्हणाले, आदिवासी कलाकारांना खुले व्यासपीठ मिळावे, यासाठी ऑनलाईन माहिती व नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. जोपर्यंत तळागाळातील आदिवासी माणसाशी नाळ जोडली जाणार नाही, तोपर्यंत आदिवासी समाज समजून घेता येणार नाही, असे सांगत त्यांनी, या संवाद माध्यमातून आपण थेट समाजात आलो असल्याचे स्पष्ट केले. गौरवशाली आदिवासी संस्कृती जपणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**➢ ४० हजार कलाकारांची नोंदणी; अभूतपूर्व प्रतिसाद**

या उपक्रमाला देशभरातून तब्बल ४० हजार कलाकारांनी नोंदणी करून प्रतिसाद दिला, हे या मोहिमेचे यश दर्शवते. संस्कृतीशी नाळ जोडल्याशिवाय समाज समजणार नाही. बिरसा कला संगममधून आदिवासी कला-संस्कृतीला नवी दिशा मिळत आहे,असेही त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

**१२ फेब्रुवारीपासून......**

दिले. प्रत्यक्षात मात्र टाळाटाळ सुरू आहे. त्यामुळे प्रशासन आणि सरकारच्या निर्णयाविरोधात राज्यभरातील एसटी कर्मचारी तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

अहोरात्र काबाडकष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कष्टाच्या प्रमाणात मोल दिले जात नाही. हा कामगारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. विविध महामार्ग बांधणीचे प्रकल्प असोत किंवा लाडकी बहीण योजना असो या बाबींसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी राज्यकर्त्यांची भूमिका असते. त्यात एसटी कर्मचारी समाविष्ट नसावेत ही शोकांतिका असल्याचे सदाशिव शिवणकर म्हणाले.

**शरद पवारांची प्रकृती......**

त्यांना श्वास घ्यायला काही प्रमाणात त्रास होत आहे. त्यांची प्रकृती जास्त बिघडल्याने त्यांना तातडीने पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवारांचे पुतणे श्रीनिवाज पवार यांनी सांगितलं शरद पवार यांना होणारा कफाचा त्रास रविवारी रात्रीपासून वाढला आहे, त्यामुळेच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवारांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी काय सांगितलं? -शरद पवारांच्या प्रकृतीबाबत डॉ. परवेझ ग्रँट म्हणाले की, आमच्या डॉक्टरांचं एक पथक शरद पवार यांच्या प्रकृतीची काळजी घेत आहे. काही चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्यानंतर औषधांचा दिनक्रम आणि प्रमाण ठरवता येईल. शरद पवारांवर कर्करोगाची शस्त्रक्रिया २००४ च्या आधी झाली आहे. त्यांच्यावर अमेरिका आणि भारत अशा दोन्ही देशांमध्ये याच आजारासंबंधीच्या काही शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर गेल्या काही दिवसांपासून ते आपल्या बारामती, मुंबई आणि पुण्यातील घरी दौरे करत होते. तर, राज्यभरातून राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांच्या भेटीसाठी, त्यांचे सांत्वन करण्यासाठी येत होते.

**सिंगापूरमध्ये कबुतरांना रस्त्यावर......**

विचारात घेण्यात आले आहेत. कोर्टाने नोंदवलेल्या निरीक्षणानुसार, शामला या गेल्या सहा महिन्यांपासून त्यांच्या घराजवळील परिसरात कबुतरांना खायला टाकत आहेत. महिलेने या प्रकारचा गुन्हा यापूर्वी देखील केला आहे. मे २०२५ मध्ये याप्रकरणी महिलेला १,२०० सिंगापूर डॉलर रुपये दंड ठोठावण्यात आला होता. महिलेविरोधात वन्य पक्षांना खायला टाकणे आणि राष्ट्रीय उद्यान मंडळाच्या कबुतरखाना मोहिमेत हस्तक्षेप केल्याचा आरोप तिच्याविरोधात करण्यात आला. सूचना देऊनही वारंवार गुन्हा - यानंतर देखील महिला या भागातच कबुतरांना खायला टाकत असल्याचे दिसून आले. रस्त्यावर महिला धान्य आणि ब्रेडचे तुकडे टाकत असल्याचे अधिकाऱ्यांनी पाहिले होते. महिलेविरोधात दाखल करण्यात आलेल्या आरोपत्रानुसार, महिला रात्रीच्या वेळेत घराजवळीत भागात कबुतरांना खायला टाकत असल्याचे दिसून आले आहे. सुनावणी सुरु असताना महिलेने तिच्याविरोधातील आरोप फेटाळून लावत पुरावा मागितला. यावेळी कोर्टात चार व्हिडिओ पुरावे सादर करण्यात आले. कबुतरांना खायला टाकत असतान महिला तिथेच उभी असल्याचे व्हिडिओत दिसत आहे.

**तिरुपती प्रसादाच्या लाडूमध्ये......**

एकदा आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने एसआयटीच्या निष्कर्षांची तपासणी करण्यासाठी एकसदस्यीय आयोग नेमण्याचा निर्णय जाहीर केला आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या एका विधानाने हे प्रकरण आणखीनच तापले आहे. नेमके प्रकरण काय? चंद्राबाबू नायडू काय म्हणाले? तिरुपती मंदिरातील प्रसादाचा वाद - मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी कुर्नूल येथील एका सार्वजनिक कार्यक्रमात केलेल्या एका दाव्यामुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. लाडू तयार करणाऱ्या प्रसादाच्या तुपात बाथरूम स्वच्छ करण्यासाठी वापरले जाणारे रसायन मिसळले असल्याचा दावा त्यांनी केला. नायडू यांच्या दाव्यानंतर आंध्र प्रदेशमधील राजकारण तापले आहे. त्यांनी माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांना लक्ष्य केल्याचे सांगितले जात आहे. परंतु, विरोधकांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

**बांधकामातून उडणाऱ्या धुळीमुळे ......**

सर्वाधिक फटका बांधकाम कामगार, रस्त्यालगत राहणारे नागरिक, वृद्ध, लहान मुले आणि दमा, हृदयविकार असलेल्या रुग्णांना बसतो. मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या निरीक्षणानुसार गेल्या काही वर्षांत श्वसनविकारासाठी बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णसंख्येत २० ते २५ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. डोळ्यांची जळजळ, त्वचारोग, सतत खोकला, श्वासोच्छ्वासाचा त्रास ही लक्षणे सामान्य होत चालली आहेत. नियमांनुसार बांधकामस्थळी पाणी फवारणी, हिरवे जाळे (ग्रीन नेट), साहित्य झाकणे, वाहतूक करताना ट्रक कव्हर करणे आणि मलबा शास्त्रीय पद्धतीने हटवणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या उपाययोजना कागदपुरत्याच राहतात. सीपीसीबी आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांनी वारंवार इशारे दिले असले तरी अंमलबजावणीतील ढिलाईमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

# दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांना खान्देशरत्न पुरस्कार बहाल

प्रतिनिधी । धुळे

**येथील वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळातर्फे मानाचा खान्देशरत्न पुरस्कार मराठी चित्रपट व मालिका दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांना दिमाखदार सोहळ्यात बहाल करण्यात आला.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळाच्या अध्यक्षा स्मिता अजमेरा या होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून आ. राम भदाणे, प्राचार्य डॉ. डी झेड.चौधरी, सचिव ऋषि अजमेरा, धुळे चॅरिटेबलचे अध्यक्ष आशिष अजमेरा, चंद्रशेखर पाटील, नगर सचिव मनोज वाघ आदी उपस्थित होते.

सत्कारमूर्ती सचिन गोस्वामी यांनी माझे मित्र व संस्थानिक, एका राजकीय घराण्याचे कै. अतुल रमेश अजमेरा याच्या कार्य व विविध आठवणींना उजाळा दिला. वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित कला, वाणिज्य व बी. सी. ए. महिला महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात संस्कृता स्त्री पराशक्ती या विद्यापीठ गीताने तसेच नटराजनच्या मूर्तीचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डी. झेड. चौधरी यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलन आ. राम भदाणे म्हणाले की, खान्देशरत्न पुरस्कार सोहळा व संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी मंत्री व संस्थेच्या संस्थापक कै. कमलाबाई अजमेरा यांच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक केले. यावर्षीच्या पुरस्काराची मानकरी विद्यार्थिनी कल्याणी बापु मराठे ही असून संस्थेच्या अध्यक्षा स्मिता अजमेरा, प्राचार्य डॉ. डी. झेड. चौधरी, सचिव ऋषि अजमेरा तसेच विविध मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

राज्यशास्त्र विषयाची या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विविध नृत्य, लावणी, निबंध स्पर्धा, रांगोळी, केश रचना, वेशभूषा, साडी डे, पाककला, मेहंदी स्पर्धा, कोलाज, पेंटिंग अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

## सावली खान्देश कला महोत्सव

प्रतिनिधी । धुळे

अखिल भारतीय मराठी शाहीर परिषद धुळे व सावली वृद्धाश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी हिरे भवन, कोर्टा समोर धुळे येथे दुपारी ३ वाजता कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. नवोदित युवकांना प्रोत्साहन व ज्येष्ठ कलावंतांचा सन्मान हा या मागील प्रमुख उद्देश आहे. शहरी व ग्रामीण भागातील शालेय व महाविद्यालयीन तसेच दुर्गम भागातील लोक कलावंत हे या महोत्सवामध्ये सहभागी होणार आहेत. उपस्थितीचे आवाहन आयोजकांनी केले.

## तळोदा येथे रमाई आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी । तळोदा

**येथील प्रज्ञासूर्य फाउंडेशन व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगरसेविका जयश्री महाले होत्या.**

रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर कार्यक्रमात रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावर पुष्पा ब्राह्मणे व सुजाता साळवे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडण्यामागे माता रमाई आंबेडकर यांच्या मोठा त्याग व समर्पण आहे. त्यांच्या त्यागामुळे आज समाजातील स्त्रिया सन्मानाने जीवन जगत आहेत. बाबासाहेबांच्या पश्चात त्यांनी कुटुंबाकडे लक्ष देऊन बाबासाहेबांची उणीव कुटुंबाला कधीही जाणऊ दिली नाही. याबाबत बाबासाहेबांनी देखील रमाई आंबेडकर यांच्याबद्दल नेहमीच कृतज्ञता व्यक्त असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सामाजिक परिवर्तनामागे माता रमाई आंबेडकर यांचे पाठबळ असल्याचे सांगून त्यांच्याबद्दल देखील कृतज्ञता व्यक्त करून त्यांची जयंती व्यापक स्वरूपात पुढच्या वर्षापासून साजरा करण्याचा निर्धार बोलून दाखविला. प्रतिमापूजनानंतर सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. या कार्यक्रमाला कल्पना बोरसे, विद्या नागमल, गीता गाडे, तक्षशिला पिंपळे, मीनाक्षी महिरे, प्रियंका पवार, सुनिता बागले, मंगला आगळे, सुरेखा गवळे, निकिता बोरसे आदींसह महिला वर्गाची उपस्थिती होती.

# पर्यावरणाचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी

## ● वनपाल सोनाली बोरसे यांचे प्रतिपादन; गावित विद्यालयात पर्यावरणावर जनजागृती

प्रतिनिधी । नंदुरबार

**प्रदूषण, जंगलतोड, पाण्याची नासाडी, हवामान बदल अशी अनेक मोठी आव्हाने आज मानवासमोर आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन वनपाल सोनाली बोरसे यांनी केले.**




वावद (ता. नंदुरबार) येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात सामाजिक वनीकरण विभागाच्यावतीने 'पर्यावरणाची रक्षा व जगाची रक्षा' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी नाशिक येथील अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी राहुल पाटील, वनपाल आरती नगराळे, वनरक्षक रेखा गिरासे, मुख्याध्यापक मनोहर साळुंके, गोपाल शिंत्रे, नितीन पाटील, सागर पाटील, सुनील पाटील, महेंद्र पाटील, मिनाक्षी व्यास, प्रिती नाईक, अश्विनी पाटील, पावबा ठाकरे, संजय पाटील, दीपक माळी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पर्यावरण, वृक्ष व औषधी वनस्पती संदर्भात माहितीपट दाखवण्यात आला. तसेच पर्यावरणाचे संरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# बारावीची परीक्षा ८२ परीक्षा केंद्रांवर होणार
# कॉपीमुक्तसाठी जिल्हा प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी

प्रतिनिधी । जळगाव

**फेब्रुवारी–मार्च महिन्यात होणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा पूर्णतः कॉपीमुक्त, पारदर्शक व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. त्यासंदर्भातील पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**



बैठकीत देण्यात आलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात बारावीची परीक्षा दि. १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत ८२ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. यासाठी ४८ हजार २३२ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. तर दहावीची परीक्षा दि. २० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान १४७ केंद्रांवर घेण्यात येणार आहे . ५९ हजार ४२० विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवरील पाणी, वीज, स्वच्छता, बैठक व्यवस्था आदी मूलभूत सुविधांची तपासणी बीओ केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी पूर्ण केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य करण्यात आली असून, ज्या केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध नाही, तेथे तातडीने बसविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. प्रश्नपत्रिकेच्या वाहतुकीसाठी पोलीस बंदोबस्त, परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स दुकाने बंद ठेवणे, तसेच ५० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी लागू करण्याचे आदेश देण्यात आले.संवेदनशील केंद्रांवर बैठी व फिरती पथके, ड्रोन कॅमेरे व व्हिडिओग्राफीद्वारे विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, मोबाईलच्या गैरवापरास प्रतिबंध करण्यासाठी कडक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर मालप्रॅक्टिसेस कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.कॉपीमुक्त परीक्षा राबविण्यासाठी जिल्हाभरात झूम पद्वारे नियंत्रण ठेवण्यात येणार असून, प्रत्येक वर्गामध्ये झूमद्वारे व्हिडिओ चित्रीकरण केले जाणार आहे. यासाठी तालुकास्तरावर तसेच जिल्हास्तरावर स्वतंत्र समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना निर्भय, शांत व अनुकूल वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. निष्पक्ष व गुणवत्ताधिष्ठित परीक्षा प्रक्रिया राबविणे ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### ➤ परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त वातावरणात पार पाडावी - पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा विद्यार्थ्यांना संदेश

इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर, परीक्षा प्रक्रिया कॉपीमुक्त, भयमुक्त व शिस्तबद्ध वातावरणात पार पडावी, असे आवाहन जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी कोणताही तणाव न घेता आत्मविश्वासाने व प्रामाणिकपणे परीक्षांना सामोरे जावे, असे त्यांनी सांगितले. भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा ही केवळ प्रशासनाचीच नव्हे तर समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आगामी परीक्षा काळात जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर पारदर्शक व शिस्तबद्ध वातावरण राखण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## स्थायी सभापतीपदासाठी दोघांत चुरस

प्रतिनिधी । जळगाव

येथील जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौरपदी निवड झाल्यानंतर आता इतर समिती सभापतींच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच स्थायी समिती सभापती म्हणून दीपक सूर्यवंशी आणि डॉ. चंद्रशेखर पाटील यापैकी एक नाव अंतिम होणार असल्याची माहिती भाजपच्या गोटातून मिळाली आहे.

# जिल्ह्यात शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जिल्ह्यात येत्या १८ व १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात येणार आहे. या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या वतीने दोन दिवसीय जिल्हास्तरीय भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व स्पर्धात्मक उपक्रमांचा समावेश असणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम साजरा करण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी सकाळी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात येणार असून, त्यानंतर किल्ले बनविण्याची स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व नागरिकांना छत्रपती



शिवाजी महाराजांचा इतिहास, पराक्रम, विचार व कार्य यांची ओळख करून देण्यात येणार आहे.

याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण जीवनपट उलगडणारा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम व नाट्यप्रयोग छत्रपती संभाजीराजे नाट्यगृह, जळगाव येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत कलाकार सहभागी होणार असून, शिवचरित्रावर आधारित सादरीकरणातून उपस्थितांना प्रेरणादायी अनुभव मिळणार आहे.

किल्ले बनविण्याच्या स्पर्धेसाठी आवश्यक माती, बॅरिकेडिंग व मार्किंगची व्यवस्था जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येणार आहे. तसेच चित्रकला स्पर्धेसाठी लागणाऱ्या कागदाची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात येईल. मात्र, किल्ले सजावटीसाठी लागणारे साहित्य तसेच चित्रकलेसाठी आवश्यक रंग व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणणे अपेक्षित आहे.

या सर्व स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांचा जिल्हास्तरावर सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी विविध मान्यवरांना निमंत्रित करण्यात येत असून, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले.

## जळगावात मुख्यमंत्री शिंदेंच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान

प्रतिनिधी । जळगाव

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विधानसभा क्षेत्र प्रमुख श्याम कोगटा यांच्या पुढाकाराने शिवसेना युवा सेना व शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जळगाव यांच्या वतीने भव्य अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जनतेची सेवा हाच खरा वाढदिवस साजरा करण्याचा मार्ग आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.**

सदर कार्यक्रमाचे आयोजन शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते श्याम कोगटा यांच्या पुढाकाराने करण्यात आले. समाजातील गरजू, वंचित व निराधार बांधवांना अन्नदान करून एकनाथ शिंदे यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व अधिक बळ मिळावे, अशी मनोभावे सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आली. या भावनिक व सेवाभावी उपक्रमाला महानगरपालिकेचे उपमहापौर मनोज चौधरी, युवा सेना जिल्हाप्रमुख रोहित कोगटा, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख जितेंद्र गवळी, शिवसेना सोशल मीडिया उपजिल्हा प्रमुख सोनू तायडे, युवा सेना उपमहानगर प्रमुख विशाल निकम, महानगर प्रमुख दीपक पाटील यांच्यासह असंख्य शिवसैनिकांची उपस्थिती लाभली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे केवळ एक नेता नसून सर्वसामान्यांचा आधारवड आहेत. त्यांच्या संवेदनशील नेतृत्वातून प्रेरणा घेऊन शिवसेनेचे कार्यकर्ते सातत्याने सामाजिक बांधिलकी जपत जनसेवेचे कार्य करत आहेत, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रम अत्यंत भावनिक, उत्साही व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. शेवटी उपस्थित शिवसैनिकांनी 'एकनाथ शिंदे आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं' अशा भावना व्यक्त करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## धावत्या रेल्वेतून दागिने लांबवणारा चोरटा जेरबंद

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव ते भुसावळ दरम्यान धावत्या रेल्वेतून प्रवाशांचे दागिने चोरी करणाऱ्या एका अट्टल चोरट्यास गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याच्या एका साथीदाराचा शोध सध्या सुरू आहे. अयोध्या येथील रहिवासी आनंद मोर्या हे ८ फेब्रुवारी रोजी झेलम एक्सप्रेसने प्रवास करत होते. यावेळी त्यांच्या बॅगेतून सोने-चांदीचे दागिने लांबवले होते.

## समता सैनिक दलाची जिल्हास्तरीय बैठक उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

समता सैनिक दलाची (संस्थापक–विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर) जळगाव जिल्हास्तरीय बैठक राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्यातील १५ पैकी १३ तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.



या बैठकीत समता सैनिक दलाची ऐतिहासिक वाटचाल, संघर्ष, शिस्त व तत्वनिष्ठा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व भारतीयांवर महान उपकार आहे. हे सर्व मान्य देखील करतात. मग या महापुरुषाने स्थापन केलेल्या समता सैनिक दलात का सामील होत नाहीत, असा सवाल यावेळी करण्यात आला. देशातील एकंदर परिस्थिती बघता, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचारांना घराघरात, गावागावात पोहचविण्याचे काम समता सैनिक दलाला करायचे आहे. या बैठकीत जिल्हा (पूर्व आणि पश्चिम) कार्यकारिणी स्थापन करण्यात आल्या. समता सैनिक दलाची जळगाव जिल्हा पश्चिम कार्यकारणी अध्यक्ष किशोर डोंगरे (पाचोरा), उपाध्यक्ष विलास शिंदे जळगाव, सचिव अनिल सोनवणे भुसावळ, सहसचिव वाल्मीक शिरसाठ भडगाव, सहसचिव भाईदास गोलाईत चाळीसगाव, प्रसिद्धीप्रमुख अरुण खैरे पाचोरा, संघटक गोकुळ अहिरे एरंडोल, संघटक सरलाबाई गायकवाड पाचोरा, संघटक अभिमन्यू बाविस्कर पाचोरा, संघटक संतोष भालेराव अमळनेर, प्रचारक कलावती गायकवाड यांचा समावेश आहे.

# गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त कांचननगर परिसरात भव्य पालखी सोहळा उत्साहात

## 'गण गण गणात बोते'चा जयघोष, विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन







प्रतिनिधी । जळगाव

**संत श्री गजानन महाराज यांचा १४८ वा प्रकटदिन सोहळ्यानिमित्त रविवारी सकाळी महाजन परिवारातर्फे कांचननगर परिसरात भक्तिमय वातावरणात भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गण गण गणात बोतेच्या जयघोषाने संपूर्ण परिसर न्हाहाळुन गेला होता. यावेळी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने पालखीत सहभागी झाले होते.**

दरवर्षीप्रमाणे महाजन परिवारातर्फे श्री गजानन महाराज प्रकटदिन सोहळ्यानिमित्त महाजन आर्ट, कांचननगर, कालिंका माता मंदिराजवळ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी ही परंपरा कायम ठेवली जात असून यंदाचे हे २५ वे वर्ष आहे. या ठिकाणी दि. ४ ते ८ फेब्रुवारीपर्यंत श्री गजानन विजय ग्रंथ पारायण सोहळ्यात शेकडो भाविकांनी एकाग्रतेने ग्रंथाचे वाचन केले.

पहाटे काकड आरतीपासून सुरू होणारा हा सोहळा रात्री शेजआरतीपर्यंत भक्तीमय वातावरणात पार पडत होता. विशेषत म्हणजे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग लक्षणीय होता. रविवारी सकाळी १०.३० वाजता महाजन आर्ट परिसरातून श्रींची भव्य पालखी काढण्यात आली. पालखीत पारंपारिक वेशभूषेतील वारकरी, टाळ-मृदंगाचा गजर आणि महिला भजनी मंडळांचा सहभाग होता. तसेच ठिकठिकाणी परिसरातील नागरिकांनी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून पालखीचे स्वागत केले. यावेळी तरुणी-महिलांनी डोक्यावर कळस, तुलसी, ग्रंथ घेऊन पालखीत सहभाग नोंदविला. तसेच पालखीचे जागोजागी गृहिणी पूजा-अर्चा करीत होते. पालखीत असलेली गजानन महाराजांची प्रतिमा, विजय ग्रंथ आणि पादुका आकर्षणाचे केंद्र ठरले होते. पारायणाच्या सांगता दिनी श्रींची पालखी काढण्यात आली.

महाजन आर्टपासून काढण्यात आलेल्या पालखीचा समारोप महाजन आर्ट येथे झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री ची महाआरती करण्यात आली. यावेळी नगरसेविका सिंधुताई कोल्हे, शिवसेना शिंदे गटाच्या महिला जिल्हाध्यक्ष सरिता कोल्हे-माळी, माजी नगरसेवक कैलास सोनवणे, किशोर बाविस्कर, उज्वला बाविस्कर, नगरसेवक निलेश तायडे, नगरसेवक प्रवीण कोल्हे, सामाजिक कार्यकर्ते मोहन तिवारी, शिवसेनेच्या शोभा चौधरी, ज्योती शिवदे आदी उपस्थित होते.

**गण गण गणांत बोतेच्या जयघोषाने जळगाव दुमदुमले**

या संपूर्ण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी वसंत पाटील, यमुना पाटील, नंदू पाटील, हिरकणी पाटील, रवींद्र पाटील, संगीता पाटील, अनिल पाटील, प्रतिभा पाटील (महाजन परिवार) आदींनी सहकार्य केले.

### इंद्रप्रस्थ नगरात गजानन महाराज प्रगट दिन सोहळ्याचा थाटात समारोप

जळगाव शहरातील इंद्रप्रस्थ नगर येथील केशर बाग परिसरामध्ये संत श्री गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त आयोजित चार दिवसीय महोत्सवाचा रविवारी मोठ्या उत्साहात समारोप झाला. भक्ती, शक्ती आणि चैतन्याच्या वातावरणात निघालेल्या पालखी सोहळ्याने संपूर्ण परिसर शेगावमय झाला होता.

गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. रविवारी संध्याकाळी श्रींच्या पालखीचे प्रस्थान झाले.

यावेळी ढोल-ताशांच्या गजरात आणि गण गण गणांत बोतेच्या जयघोषाने परिसर निनादला. या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेले भाविक. डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या महिलांनी मिरवणुकीत शिस्तबद्ध सहभाग नोंदवला. पुरुष, लहान मुले आणि स्त्रिया पारंपरिक पेहरावात दिसून आल्या, ज्यामुळे सोहळ्याला एक वेगळीच शोभा प्राप्त झाली होती. ही शोभायात्रा इंद्रप्रस्थ नगरातील विविध कॉलनी व परिसरातून काढण्यात आली. ठिकठिकाणी भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले आणि रांगोळ्या काढून स्वागत केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष सोनावणे, सचिव गणेश शेळके, आणि उपाध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

याप्रसंगी योगेंद्र पवार, राजेंद्र बडगुजर, सतीश वाणी, प्रकाश शेवाळे, डॉ. सोपान पाटील, सतीश भोसले, नरेंद्र पाटील, मनोज कपाते, राहुल पाथरवट, राजेश पाटील, वैभव जैन, हर्षा भोसले, छाया पाटील, प्रिया थोरवे, सुरेखा चव्हाण, वैशाली पाटील यांसह अनेक भाविक आणि स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले. महोत्सवाच्या सांगता प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. शिस्तबद्ध नियोजन आणि भाविकांच्या अलोट गर्दीमुळे हा सोहळा जळगावकरांसाठी एक अविस्मरणीय भक्तीचा अनुभव ठरला.

## थोडक्यात

### नगरदेवळा येथे घरावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न

**पाचोरा ।** तालुक्यातील नगरदेवळा येथे मुंबई पोलीस अधिकाऱ्याच्या घरावर मध्यरात्री पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु कुठलीही हानी होण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्याच्या आईच्या दक्षतेमुळे चोर पळाले व आग विझविण्यात आली. नगरदेवळा येथील राऊळ गल्लीत मुंबई पोलिस दलातील पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) देवेंद्र उमेश राऊळ यांच्या घरावर रात्री २.३० ते ३ वाजेच्या सुमारास पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेत सुदैवाने घरातील दोघा महिलांना (आई आणि बहिण) वेळीच जाग आल्याने त्यांनी आग आटोक्यात आणली. अन्यथा मोठी दुर्घटना घडू शकली असती. हल्लेखोर दोन अज्ञात व्यक्ती नंबर प्लेट नसलेल्या दुचाकीवरुन आले होते. पाचोरा पोलिसात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत ६० वर्षीय वृद्धाचा मृत्यू ; चालक फरार

**भुसावळ ।** येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर साकेगाव शिवारात एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने ५० ते ६० वर्ष वयोगटातील एका अज्ञात इसमाचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघात घडल्यानंतर वाहनचालक मदतीसाठी न थांबता वाहन घेऊन पसार झाला आहे. याप्रकरणी भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी पहाटे ४:३० वाजेपूर्वी साकेगाव येथील चहाच्या दुकानासमोर हा अपघात घडला. जळगावकडून भुसावळच्या दिशेने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव जाताना एका पादचारी वृद्धाला जोरदार धडक दिली. या धडकेत वृद्धाला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. मृताचे वय अंदाजे ५० ते ६० वर्षे आहे. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. याप्रकरणी साकेगावचे पोलीस पाटील गणेश शांताराम भोई (३१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कळमसरे–शहापूर रस्त्यावर जीवघेणा प्रवास

## ● रस्ता कामास आला वेग; सूचना फलक न लावल्याने रात्री अपघाताचा धोका

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील कळमसरे–शहापूर रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या रस्त्यावर फरशी पुलाचे कामे सुरु आहे. मात्र सूचना फलक नसल्याने रात्रीच्या वेळेस अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.**

कळमसरे–शहापूर रस्त्याच्या कामाला सुमारे ४ कोटींचा निधी मंजूर असून रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरु आहे. त्यातही माती मिश्रित बारीक खडीचा वापर करून खडी दाबली जात आहे. त्यातच शहापूर– कळमसरे या पाच किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर जवळपास १० ठिकाणी लहान फरशी पुलाची कामे होणार आहेत. सध्यस्थितीत फरशी पुलासाठी रस्ता



मध्यभागी कोरला गेला आहे. तर वापरण्यासाठी बाजूलाच पर्यायी रस्ता तयार करण्यात आला असला तरी रात्रीच्या वेळी वाहनचालकाला याचा अंदाज न आल्यास अपघाताची शक्यता नाकारता येणार नाही.

फरशी पुलासाठी रस्त्यावर खोदकाम केले असल्याने संबंधित ठेकेदाराने सूचना फलक लावणे गरजेचे आहे. याबाबत मात्र ठेकेदाराचा निष्काळजीपणा दिसून येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष घालावे, अशीही मागणी वाहनचालकांकडून होत आहे. कामाच्या गुणवत्तेवर नेहमीच दुर्लक्षित असणारा या रस्त्याला माजी मंत्री अनिल पाटील यांनी या रस्त्यासाठी मागील पंचवार्षिक काळातच सुमारे ४ कोटी रुपयांचा निधी मिळवून दिला आहे. रस्त्याची गुणवत्ता टिकून राहावी यासाठी कळमसरे, शहापूर येथील ग्रामस्थांचे लक्ष असून कामात गुणवत्ता नसल्यास रस्त्याचे काम बंद करण्यात येईल, असाही इशारा देण्यात आला आहे. रस्त्याच्या कामाबाबत संबंधित अधिकारी यांनी लक्ष घालावे, असेही बोलले जात आहे.

## श्री धनदाई माता उच्च माध्य. विद्यालयात केंद्र सभा

प्रतिनिधी । पारोळा

**येथील धनदाई माता बहुउद्देशिय शिक्षण संस्था अंचाळे संचलित उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शालांत परीक्षा २०२६ च्या संदर्भात केंद्रसभा आयोजित करण्यात आली होती. सभेचे अध्यक्ष संस्थेचे चेअरमन प्रा.डी. बी. पाटील यांनी भूषविले.**

केंद्र संचालक प्राचार्य उमेश पाटील, तसेच टेहूचे उपप्राचार्य प्रा.एस.एस.पाटील, प्रा.अशोक शांताराम देवरे, प्रा.बडगुजर, प्रा.ढोले, पी.जे.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सहविचार सभा संपन्न झाली. सभेत फेब्रुवारी मार्च २०२६ च्या बोर्ड परीक्षेसंदर्भात शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कॉपीमुक्त अभियान व सुयोग्य परीक्षा नियमावली यासंदर्भात चर्चा करण्यात आली. केद्रसंचालक प्राचार्य उमेश पाटील यांनी उच्च माध्य. बोर्डातर्गत सर्व सूचनांची माहिती सर्व पर्यवेक्षकांना दिली. तसेच परीक्षा केंद्रावर भरारी पथक, विशेष पथकांची नियुक्ती केली आहे. सर्व परीक्षकांनी परीक्षा सुयोग्य पद्धतीने पार पाडण्यास सहकार्य करावे, असे आवाहन केले. संस्थाध्यक्ष प्रा.डी.बी. पाटील यांनी परीक्षा सुयोग्य नियोजनाने व तणावमुक्त पद्धतीने कशी होईल? याविषयी माहिती दिली व सर्व पर्यवेक्षकांनी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## धरणगावच्या आदर्श विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

प्रतिनिधी । धरणगाव

इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व आदर्श माध्यमिक विद्यालय, धरणगाव यांच्या संयुक्तिक दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यानिमित्त विद्यार्थ्यांना निरोप देतानाच विविध शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देऊन सचोटी व शिस्तीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष व इंदिरा गांधी विद्यालयाचे सचिव सी. के. पाटील होते. प्रमुख पाहुणे आदर्श विद्यालयाच्या



सचिव व इंदिरा गांधी विद्यालयाच्या प्राचार्या सुरेखा पाटील उपस्थित होत्या. यावेळी आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे, इंदिरा गांधी विद्यालयाचे पर्यवेक्षक ए. एस. पाटील, माजी पर्यवेक्षक आर. एस. पडोळ तसेच सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षक एन. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. वर्षभरात शालेय, तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करण्यात आली. यावेळी परीक्षांमध्ये प्रामाणिकपणा व शिस्त पाळण्याचा निर्धार करत विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेची शपथ घेतली. दहावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगतातून शालेय जीवनातील आठवणी, शिक्षकांविषयीची कृतज्ञता व भविष्यातील ध्येय व्यक्त केली. डिंपल जावरे, वैष्णवी महाजन, अक्षदा इंगळे, उज्ज्वला धामोडे, आकांक्षा गुंजाळ, मिलिंद कोल्हे, चैताली सयाजी, जान्हवी पाटील व मिताली चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी आदर्श माध्यमिक विद्यालयाच्या दहावीच्या वर्गशिक्षिका वैशाली पाटील व विद्यार्थ्यांनी विद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त करत शाळेला समई भेट दिली. ही समई ज्ञानाचा प्रकाश सदैव तेवत ठेवण्याचे प्रतीक असल्याचे मान्यवरांनी सांगितले. मार्गदर्शन करताना आर. एस. पडोळ, ए. एस. पाटील व संदीपकुमार सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सातत्य व शिस्तीचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्या सुरेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांनी स्पष्ट ध्येय ठेवून मेहनत व प्रामाणिकपणाच्या बळावर यश मिळवावे, असे आवाहन केले.

# शुद्ध भावनेने केलेले संकल्प सहज पूर्णत्वास जातात : महामंडलेश्वर जनार्दन महाराज

प्रतिनिधी । यावल

**फैजपूर येथील समाजाच्या कल्याणासाठी व उन्नतीसाठी सद्भावनेतून चांगले संकल्प करावेत, सेवावृत्ती जोपासावी तसेच संत–महंतांचे मार्गदर्शन व आशीर्वाद घेत शुद्ध भावनेने केलेले संकल्प सहज पूर्णत्वास जातात, असे प्रतिपादन महामंडलेश्वर जनार्दन हरी महाराज यांनी केले.**

उटखेडा येथील सतपंथ ज्योत मंदिराच्या कळसारोहन व ध्वजारोहण समारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, संस्कृती जतन व



संस्कार निर्मितीसाठी मंदिरांची उभारणी व जतन करणे ही काळाची गरज आहे. संपत्ती जमवण्यापेक्षा समाजातील परस्पर प्रेम, सौजन्य व एकोपा वाढवणे महत्त्वाचे आहे. खऱ्या समाधानाचा मार्ग परमार्थात आहे. या पवित्र सोहळ्यावेळी अध्यक्षस्थानी प.पू. महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्यासह महामंडलेश्वर श्री पवनकुमारदासजी महाराज (फैजपूर), शास्त्री अनंतप्रकाशदासजी (सावदा), महंत भरतदासजी महाराज (कुसुंबा), श्री विजयदासजी महाराज (कुसुंबा),

● गावाच्या सर्वांगीण कल्याणासाठी कळस व धर्मध्वज असलेली मंदिरे समाजाला दिशा देतात, असेही त्यांनी नमूद केले. सर्व संतांनी सतपंथ ज्योत मंदिरापासून श्रीराम मंदिरातील धर्मपीठापर्यंत नामस्मरणाच्या गजरात आगमन केले.

ह.भ.प. गोपाळ महाराज मानकरे (विवरा) तसेच ह.भ.प. श्यामदास महाराज (उटखेडा) उपस्थित होते. सकाळी वैदिक मंत्रोच्चारात कळस व धर्मध्वजाचे पूजन करून कळसारोहन करण्यात आले. प्रारंभी दीपपूजन व श्रीराम पूजन पार पडले. व्यासपीठावरील संतांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून ग्रामस्थांनी सन्मान केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण महाजन यांनी केले. समारंभानंतर सर्व गावकरी व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. पंचक्रोशीतील भाविकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उटखेडा सतपंथ सेवक मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

### जळगाव जिल्ह्यात थंडी ओसरली

प्रतिनिधी । जळगाव

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून जाणवणारा थंडीचा कडाका आता हळूहळू ओसरू लागला आहे. तापमानात वाढ होत असल्याने दिवसा उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. हिवाळा संपत असतानाच उन्हाळ्याची चाहूल लागल्याने सध्या दुहेरी हवामानाचा अनुभव येत आहे. रविवारी जळगावचे किमान तापमान १५ अंशसेल्सिअसपर्यंत नोंदवले गेले, तर कमाल तापमान ३३ अंशांवर पोहोचले. फेब्रुवारीच्या पहिल्याच आठवड्यात पारा ३३ अंशांवर येवून ठेपला आहे.

# पाडळसे येथे विजेचा धक्का लागून वानराचा मृत्यू

## पशुवैद्यकीय दवाखान्याच्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी । यावल

**तालुक्यातील पाडळसे येथील गावठाण परिसरात विजेचा तीव्र धक्का लागून एक वानर जबर जखमी झाल्याची घटना घडली. जखमी वानराला वाचवण्यासाठी गावातील तरुणांनी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र वेळेवर उपचार न मिळाल्याने अखेर शनिवारी या वानराचा मृत्यू झाला.**

या घटनेमुळे गावातील बंद राहणाऱ्या पशुवैद्यकीय दवाखान्याबाबत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शुक्रवारी (दि. ६) दुपारी १२:३० च्या सुमारास वानरांचा एक कळप गावठाण परिसरात वावरत होता.

यावेळी एका वानराचा उंच वीज वाहिनीला स्पर्श झाला आणि जोरदार झटका बसून ते जमिनीवर कोसळले. ही माहिती मिळताच गावातील स्वयंसेवक भैय्या भोई, भूषण कोळी, प्रसाद तावडे, जगदीश कोळी, योगेश कोळी, प्रवीण कोळी आणि गणेश कोळी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तरुणांनी जखमी वानराला तातडीने पाडळसे येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेले.



मात्र, दवाखाना बंद अवस्थेत होता. वेळ वाया घालवू नये म्हणून या तरुणांनी वानराला भुसावळ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी हलवले. प्राथमिक उपचार करून वानराला पाडळसे येथील श्री. भिल्लटबाबा गो–शाळा येथे देखरेखीखाली ठेवण्यात आले होते.

मात्र, अंतर्गत जखमा गंभीर असल्याने शनिवारी सकाळी या वानराची प्राणज्योत मालवली. पोलीस पाटील सुरेश खैरनार यांनी घटनेची माहिती वनविभागाला दिली. फैजपूर वनपरिक्षेत्र अधिकारी अतुल तायडे आणि सतीश वाघमारे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. त्यानंतर वानराचे विधिवत पूजन करून दफनविधी करण्यात आला. यासाठी रमेश लोहार यांनी सहकार्य केले. पाडळसे येथील पशुवैद्यकीय दवाखाना दररोज दुपारी १२ वाजेनंतर बंद असतो. जर या वानराला तातडीने पाडळसे येथेच उपचार मिळाले असते, तर कदाचित त्याचा जीव वाचला असता, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित विभागावर कारवाई करण्याची मागणीही आता जोर धरत आहे.

### गर्दीचा फायदा घेत वृद्धेचे मंगळसूत्र लांबवले

प्रतिनिधी । जामनेर

बसस्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र शिताफीने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी जामनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मंगलाबाई हिरालाल जैन (वय ६९, सध्या रा. लोहगाव, पुणे, मूळ रा. भुसावळ) या दि. ८ रोजी सकाळी ५:२० वाजेच्या सुमारास जामनेर बसस्थानकावर आल्या होत्या. त्यांना पाचोरा ते भुसावळ या मार्गावरील बसने (क्रमांक २३०६) भुसावळकडे जायचे होते. बसस्थानकावरील गर्दीचा फायदा चोरट्याने उचलला.

# राजुरा घरकुल घोटाळा प्रकरण : लाभार्थ्यांच्या मालमत्तांवर बोजे तर अधिकाऱ्यांना नोटीस

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**तालुक्यातील राजुरा गावातील घरकुल व गायगोठे घोटाळा प्रकरण गाजत आहे. आता पं.स. प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे. शासकीय अनुदान लाटणाऱ्या त्या दोषी लाभार्थी व संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.**

याबाबत मुक्ताईनगर तालुक्यातील राजुरा गावात घरकुल व गायगोठे या शासकीय योजनांचा काही लाभार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे. त्यापैकी राजुरा येथील पंकज रामधन रोटे यांनी तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर यांचेकडे तक्रार केली होती. त्यानुसार रामधन रोटे, वैशाली रोटे, गौतम रोटे, दीपाली रोटे, राहुल रोटे आणि कल्पना रोटे यांनी घरकुले व गाय गोठ्यांचा लाभ घेतलेला आहे. परंतु प्रत्यक्षात बांधकाम न करता शासकीय अनुदान लाटले आहे, अशी तक्रार प्राप्त झाली होती. गृहनिर्माण अभियंता, मनरेगाचे तांत्रिक अभियंता तसेच ग्राम रोजगार सेवकांनी देखील घरकुल व गाय–गोठ्यांचे बांधकाम झालेले नसताना त्यांनी कामे प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहिली आहेत किंवा नाही? याची खातरजमा न करता, शासकीय अनुदान वितरित केले. त्यांच्यावर सुद्धा कारवाई करण्यात यावी, अशी तक्रार केलेली होती. या तक्रारीची दखल घेत तत्कालीन अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला. यामुळे आता प्रशासनातर्फे कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याने काही शासकीय योजनांचे लाभार्थी व संबंधित प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे धाबे दणाणले आहे.

## जिजाबराव पाटील यांची जळगाव जिल्हा किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी निवड

प्रतिनिधी । धरणगाव



**भारतीय जनता पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती जिजाबराव पाटील यांची जळगाव जिल्हा किसान मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे.**

जिजाबाराव पाटील हे शेतकरी चळवळीशी सातत्याने जोडलेले असून, त्यांनी आपल्या कार्यकाळात शेतकरी हिताच्या अनेक प्रश्नांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या अनुभवाची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

या निवडीबद्दल सर्वच पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधवांकडून त्यांचे अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. जिल्ह्यातील शेतकरी प्रश्न सोडवण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करू, असा विश्वास श्री.पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# नाट्य लेखक, दिग्दर्शक सोमण यांची नगर वाचन मंदिरास भेट

प्रतिनिधी । चोपडा

**येथील तालुका वाचनालय नगर वाचन मंदिरास नाट्य लेखक, दिग्दर्शक व सिनेकलावंत योगेश सोमण यांनी आपल्या प्रवासात सदिच्छा भेट दिली.**

योगेश सोमण नुकत्याच पार पडलेल्या व्याख्यानमालेत येणार होते. परंतु त्यांना ऐनवेळी येता न आल्याने त्यांनी आवर्जून भेट देवून संस्थेच्या शतकोत्तर कार्याचा गौरव केला. त्यांच्या लिखीत



पुस्तकांसह वंदेमातरम्‌च्या सार्धशतीनिमित्ताने नॅशनल बुक ट्रस्ट दिल्लीने काढलेल्या आनंदमठ या कादंबरीचा मराठी अनुवाद भेट म्हणून दिला.

या भेटीनिमित्त त्यांचा यथोचित सत्कार वाचनालयाचे अध्यक्ष आशिष गुजराथी यांनी केला.

यावेळी कार्यवाह गोविंद गुजराथी, संचालक श्रीकांत नेवे, प्रभाकर महाजन, केंद्रप्रमुख संजिव शेटे, ग्रंथपाल गोपाळ दांडेकर आदी उपस्थित होते.